# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६

E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in

जा. क्र. तंशिविकापु/विवि/नोंदणी प्रक्रिया/२०१९-२०/ 2144 दिनांक :- 29 MAY 2019

**परिपत्रक**

प्रति,

संचालक/प्राचार्य,

या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त असलेल्या,

पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या सर्व शासकीय/

शासन अनुदानित/विद्यापीठ विभाग/विद्यापीठ संचलित/स्वायत्त संस्था,

(पुणे विभाग ).

विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता नोंदणी प्रकिंयेबाबत.

संदर्भ : १.मा.सचिव,प्रवेश नियामक प्राधिकरण,मुंबई यांचे प्रत्र क्रमांक तंशिप १२१९/प्र.क्र ५७/प्रनिप्रा/३४२, दिनांक १८/०४/२०१९

2..मा.सचिव,प्रवेश नियामक प्राधिकरण,मुंबई यांचे प्रत्र क्रमांक तंशिप १२१९/प्र.क्र ५७/प्रनिप्रा/३४३, दिनांक १८/०४/२०१९

३. मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र २ अ/एडीएम/२०११/३०७ दिनांक २०/०४/२०१९

४. मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र २ अ/एडीएम/प्रनिप्रानोंदणी २०१९/४०१ दिनांक २२/०५/२०१९.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भ क्र ३ अन्वये या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व शासकीय/ शासन अनुदानित/विद्यापीठ संचलित/ खाजगी विनाअनुदानित सर्व पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थाना प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या www.safalta.org या ऑनलाईन पोर्टलवर दिनांक २२/०४/२०१९ ते २२/०५/२०१९ या कालावधीमध्ये महाविद्यालयांची / अभ्यासक्रमांची नोंदणी प्रक्रीया पूर्ण करुन आवश्यक कागदपत्रे अपलोड /सादर करणे बंधनकारक करण्यात आले होते. तथापि अनेक महाविद्यालयानी नोंदणी प्रक्रीया पूर्ण न केल्याचे दिसून आले आहे. संदर्भ क्र ४ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१९-२० नोंदणी प्रक्रीया पुर्ण करण्यासाठी शुक्रवार दिनांक ३१/०५/२०१९ रात्री ११:५९ वाजे पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या कालावधीमध्ये अभ्यासक्रमाची नोदणी प्रक्रिया पूर्ण करुन "परिशिष्ठ-ब" मध्ये नमूद केल्यानुसार आवश्यक कागदपत्रे अपलोड/सादर करणे बंधनकारक आहे.

ज्या महाविद्यालयाना शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी नविन मान्यता प्राप्त झालेली परंतु अद्याप संदर्भाकित परिपत्रकातील नमुद केलेली आवश्यक कागदपत्रे प्राप्त झालेली नाहीत अशा महाविद्यालयांची नोंदणी प्रक्रीया सदरचे कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर करुन घेण्यात येईल.

उपरोक्त नमूद कालावधीमध्ये ज्या संस्था प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या ऑनलाईन पोर्टलवर नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यास ,कागदपत्रे/माहिती सादर करण्यास असमर्थ ठरतील अशा संस्था/महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी करण्यात येणार नाही, यांची सर्व संस्था प्रमुखांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

सोबत :- . 'परिशिष्ठ-अ'

प्र. सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता.